# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## सीमाभागातील विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठ परिसरातील अभ्यासक्रमांसाठी मोफत/ सवलतीत प्रवेश योजना

### नियमावली

शैक्षणिक वर्ष 2022-2023 पासून शिवाजी विद्यापीठाच्या वतीने महाराष्ट्र कर्नाटक सीमाभागातील विद्यार्थयांसाठी विद्यापीठ परिसरातील अभ्यासक्रमासाठी मोफत/सवलतीत प्रवेश योजना लागू करण्यात येत आहे. ती पुढील प्रमाणे :

१. शिवाजी विद्यापीठ परिसरातील अधिविभागामधील जे अभ्यासक्रम अनुदानित आहेत अशा अभ्यासक्रमास प्रवेश घेणा-या टयूश्न फी, हॉस्टेल फी घेण्यात येणार नाही.

२. विना अनुदानित अभ्यासक्रमास जे विद्यार्थी प्रवेश घेतील अशा विद्यार्थ्यांना टयुशन फी मध्ये २५% सवलत मिळेल तसेच त्यांच्याकडून हॉस्टेल फी घेण्यात येणार नाही

३. सीमाभागातील विद्यार्थ्यांकरीता वसतिगृहाची प्रवेश प्रक्रिया स्वतंत्रपणे राबविण्यात यावी. सदर विद्यार्थ्यांसाठी अधिविभागवार कोटयाची अट ठेवली जावू नये.

४. विद्यापीठातील विविध अधिविभागाकडील भाग १च्या नियमित अभ्यासक्रमांसाठी सीमाभागातील विद्यार्थ्यांकरीता अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी एकूण प्रवेश क्षमतेच्या १० टक्के जागा अतिरिक्त (Over & Above) राखीव ठेवण्यात याव्यात.

५. शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ साठी विद्यापीठ अधिविभागात जे विद्यार्थी (भाग 2, 3, 4 इत्यादी साठी ) प्रवेशित असतील ते ही वरील अटी व शर्तीच्या अधीन राहून सवलतीस पात्र राहतील. या अनुषंगाने विद्यार्थ्यांनी अधिविभागप्रमुखांच्याकडे विहीत कागदपत्रे जोडून स्वतंत्रपणे अर्ज करणे आवश्यक आहे.

६. सीमाभागातील जे विद्यार्थी विद्यापीठातील सर्टिफिकेट, डिप्लोमा, पीजी डिप्लोमा या अभ्यासक्रमांना, तसेच दूरशिक्षण केंद्राकडील अभ्यासक्रमांना प्रवेश घेतात त्यांना सदर योजना लागू नाही.

७. सीमाभागातील विद्यार्थ्यांना पीएच.डी.साठी प्रवेश मिळाल्यानंतर ३ वर्ष वसतिगृह मोफत उपलब्ध होईल.

८. ज्या अभ्यासक्रमांना शासनामार्फत सीईटी घेवून प्रवेश निर्धारित होत असतो अशा विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाल्यानंतरच उपरोक्त सवलती अटी व शर्तींच्या अधीन राहून योजना लागू होतील.

....२

९. शिवाजी विद्यापीठ अधिविभागातील नियमित अनुदानित व विनाअनुदानित पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी सीमाभागातील विद्यार्थ्यांना खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून सदर योजनेचा लाभ देण्यात येईल.

अ) मराठी भाषिक उमेदवारांनी ते महाराष्ट्र शासनाने दावा केलेल्या ८६५ गावातीलच रहिवाशी असल्याबाबतचा त्यांच्या १५ वर्षे वास्तव्याचा सक्षम प्राधिका-याचा विहीत नमुन्यातील दाखला सादर करणे अनिवार्य राहील.

ब) सीमाभागातील गावातील पुढील विद्यार्थ्यांना प्राधान्य मिळेल.
१. १० वी पर्यंत ज्यांचे शिक्षण मराठीत झाले आहे.
२. ज्यांचा १० वीला मराठी विषय आहे.
३. जे आर्थिकदृष्टया दुर्बल आहेत.

१०. सीमाभागातील जे विद्यार्थी शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ साठी जाहीर झालेल्या अभ्यासक्रमांच्या गुणवत्ता यादीत आहेत त्यांनाही वरील सवलती, अटी व शर्तीच्या अधीन राहून लागू होतील.

११. ज्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे अशा विद्यार्थ्यांना केंद्र व राज्य सरकार यांच्याकडून दिल्या जाणा-या शिष्यव्रत्ती /सवलती योजनांचा लाभ घेता येणार नाही.

१२. सीमाभागातील ज्या विद्यार्थ्यांना सदर सवलतीचा लाभ मिळेल त्यांनी सदर अभ्यासक्रम विहीत मुदतीत पूर्ण करणे आवश्यक आहे.

१३. सन २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षातील ज्या अभ्यासक्रमांना प्रवेश परीक्षा आहे अशा अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा झालेली असल्याने सीमाभागातील ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षा दिली नसेल अशा इच्छुक विद्यार्थ्यांकरीता ज्या त्या अधिविभागात प्रवेश परीक्षेचे आयोजन करून प्रवेश देण्यात यावेत.

*****************************************************************

आधिक माहितीसाठी संपर्क :-

१. डॉ. संतोष सुतार, -संपर्क क्रमांक - ८१४९६१३७४९
सह-संचालक, यशवंतराव चव्हाण स्कुल ऑफ रूरल डेव्हलपमेंट शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

२. डॉ. कविता वड्राळे -संपर्क क्रमांक - ८४०८०९९६१३
सह-संचालक, यशवंतराव चव्हाण स्कुल ऑफ रूरल डेव्हलपमेंट शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004**
Phone : EPABX –2609000 PG Admission – 2609142
Fax : +91-231-2691533 & 2692333 Website : www.unishivaji.ac.in
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर , ४१६ ००४**
फोन नं. ईपीबीकस. २६०९००० पीजी प्रवेश २६०९१४२ फॅक्स नंबर
९१–२३१–२६९१५३३ व २६९२३३३ email: pgadmission@unishivaji.ac.in

Estd. 1962
"A++"
*Accredited by*
NAAC (2021)
with CGPA 3.52

संदर्भ क्र.:शिवाजी वि./पदव्युत्तर प्रवेश/एसपीएस/ ७२२ दि. 13/09/2022

प्रति,
**मा.अधिविभागप्रमुख / समन्वयक / संचालक,**
पदवी व पदव्युत्तर अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषय :– सीमाभागातील विद्यार्थ्यांना विद्यापीठ परिसरातील अभ्यासक्रमासाठी मोफत / सवलतीत प्रवेश योजनाबाबत... ...**

**महोदय / महोदया,**

उपरोक्त विषयानुसार आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठ अधिकार मंडळाने सन २०२२–२०२३ या शैक्षणिक वर्षापासून सीमाभागातील विद्यार्थ्यांना विद्यापीठ परिसरातील अभ्यासक्रमासाठी मोफत / सवलतीत प्रवेश योजने संदर्भात तयार करण्यात आलेल्या नियमावलीस मान्यता देण्यात आलेली आहे. सोबत नियमावली जोडली आहे.

तेंव्हा सदर नियमावलीनुसार कार्यवाही करून त्याचा अहवाल या विभागास पाठवण्यात यावा ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

प्र.कुलसचिव

सोबत : वरील प्रमाणे

D:\dds\dbackup\P.G.Admission\Rodrigues\2022-2023\Letter\Letter to all Department regarding Maharashtra Karnataka Border.doc